# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.10.2025** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **युवावर्गाचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन. विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण**
- **अनुकंपा तत्वावरील आणि लिपिक श्रेणीतील 10 हजार 309 उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित.**
- **केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून लहान मुलांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वं प्रकाशित**
- **ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम अनंतात विलीन**

**आणि**

- **वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना जिंकून भारताची मालिकेत आघाडी**

**आता सविस्तर बातम्या,**

**मोदी युवकशक्ती**

आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून देशातील युवकांचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पंतप्रधानांनी काल शिक्षण, कौशल्य आणि उद्योजकतेला चालना देण्याऱ्या 62 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. कौशल्य वाढलं की देश आत्मनिर्भर होतो, निर्यात वाढली की रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होते त्यामुळे कौशल्यवृद्धीसाठीच्या पी एम सेतू योजनेमुळे देशातील युवावर्ग जगाच्या कौशल्य मागणीशी जोडला जाईल, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं. नवी दिल्लीत विज्ञान भवनात आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभाला संबोधित करताना ते बोलत होते. देशातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय केवळ प्रशिक्षणापुरत्या मर्यादित नसून त्या आत्मनिर्भर भारताच्या कार्यशाळा आहेत. देशात उत्पादकता, रोजगार, संरक्षण क्षेत्रातील  उत्पादकता वाढली आहे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये रोजगार वाढला आहे आणि याचा लाभ भारताच्या युवाशक्तीला होत आहे, असं ते म्हणाले.

**नियुक्तिपत्र-अनुकंपा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पदभरती प्रक्रिया गतीशील करून पुढच्या वर्षी मोठ्या प्रमाणात पदभरती करण्यात येणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल जाहीर केलं. शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी  लोकाभिमुख आणि पारदर्शी पद्धतीनं काम करावं असं आवाहन फडणवीस यांनी केलं. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथं सामान्य प्रशासन विभागातर्फे अनुकंपा तत्वावरील आणि लिपिक श्रेणीतील 10 हजार 309 उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरणाच्या राज्य रोजगार मेळाव्याच्या काल झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

**इंट्रोः**

अनेक विभागांचे सेवा प्रवेश नियम 50 वर्षे जुने होते. रिक्त पदं भरण्यासाठी हे सेवा प्रवेश नियम बदलण्याचा प्रयत्न आम्ही सुरू केला आणि याबाबतचे सर्व शासन निर्णय बदलून एक सुटसुटीत आणि सोपा शासन निर्णय तयार केला. आता लिपिक संवर्गातील नियुक्त्याही एमपीएससीमार्फत करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. पुढील काळात सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करून आणि भरती प्रक्रियेची गती वाढवून नियुक्त्या दिल्या जातील, असही त्यांनी सांगितलं. अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासंदर्भात आपले विचार मांडताना फडणवीस म्हणाले...

**BYTE- CM FADNMAVIS - ANUKAMPA**

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री, मान्यवर उपस्थित होते. 10 हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन करत, हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस ठरल्याचं सांगितलं. पुणे जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यातही काल 771 उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आलं. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यावेळी उमेदवारांना दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**नवीमुंबई विमानतळ**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 8 ऑक्टोबरला होणार आहे. पंतप्रधान यावेळी पहिला टप्पा राष्ट्राला समर्पित करतील. विमानतळ प्रकल्पाचं उद्घाटन ऑक्टोबर महिन्यात होणार असलं तरी प्रत्यक्ष विमान वाहतूक डिसेंबर महिन्यापासून सुरू होणार आहे.

**नितीन गडकरी**
नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती स्थानी असून, नागपूरमध्ये देशाचं विमान वाहतूक क्षेत्राचं केंद्र होण्याची क्षमता आहे असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी, काल नागपूरमध्ये केलं. "विकसित भारतामध्ये उड्डाण क्षेत्राची भूमिका", या विषयावर आयोजित परिसंवादाला गडकरी यांनी संबोधित केलं. गेल्या दहा वर्षात, देशातील विमानतळांची संख्या, 75 वरून 150 झाली आहे, देहरादून ते दिल्ली या, विमान प्रवासात, जैव इंधनाचा वापर करण्यात आला असून शेतकरी आता, परळी, भाताच्या कोंड्यापासून, विमानासाठी जैव इंधन तयार करू शकतात अशी माहिती, गडकरी यांनी यावेळी दिली.

**बाल-औषध-वापर**
लहान मुलांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं कफ सिरप आणि सर्दीवरील औषधांच्या वापराबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वं प्रकाशित केली आहेत. बालरोग तज्ज्ञ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी दोन वर्षांखालील मुलांना कफ आणि सर्दीवरील कोणतीही औषधे देऊ नयेत. तसंच, पाच वर्षांखालील मुलांसाठी या औषधांची सामान्यतः शिफारस केलेली नाही कारण, लहान मुलांमधील तीव्र कफ आणि सर्दीचे बहुतांश आजार स्वतःहून बरे होतात आणि त्यासाठी औषधांची गरज पडत नाही असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.
Intro :
यासंदर्भात पुण्यामधील ज्येष्ठ कौटुंबिक डॉक्टर दिलीप देवधर यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली...
**Byte Dr Dilip Deodhar Pradeshik News**

**एचपीव्ही-लस**
ह्युमन पॅपिलोमा व्हायरस अर्थात एचपीव्ही प्रतिबंधक लसीकरणाचा काल रत्नागिरीत प्रारंभ झाला. हे लसीकरण करणारा रत्नागिरी हा राज्यातला पहिला जिल्हा आहे, असं जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. महिलांमध्ये होणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा नवीन संसर्ग रोखणं, तसंच या कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचं प्रमाण कमी करणं हे या लसीकरणाचं उद्दिष्ट आहे.
रत्नागिरी जिल्ह्यातल्या 9 ते 14 वर्षं वयोगटातल्या 50 हजार मुलींना ही लस देण्यात येणार असून, त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून साडेचार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असल्याची माहिती सामंत यांनी दिली.

**पर्यटकबेपत्ता**
सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिरोडा - वेळागर इथल्या समुद्रात बुडालेल्या पर्यंटकांपैकी पाचवा मृतदेह मिळाला आहे. अजून दोन पर्यटक बेपत्ता असून शोध मोहीम सुरू आहे.

**7:17:45 पासून पुढे**
**संध्यानिधन-पूल**
ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना संध्या शांताराम यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या 87 वर्षांच्या होत्या. निर्माता आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या नवरंग या चित्रपटातून त्यांना प्रसिद्धी मिळाली. झनक झनक पायल बाजे, दो आँखे बारह हाथ, पिंजरा अशा विविध चित्रपटांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या. संध्या यांच्या पार्थिवावर काल दादर इथल्या शिवाजी पार्क मधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी अभिनेत्री संध्या यांना आदरांजली वाहिली.

**महिलाक्रिकेट**
महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा सामना आज पाकिस्तानबरोबर श्रीलंकेतल्या कोलंबो इथल्या आर प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तान बरोबर आतापर्यंत झालेल्या सर्व प्रकारच्या सामन्यांमध्ये भारताच्या महिला चमूनं 27 पैकी 24 सामने जिंकले आहेत.

**क्रिकेट**
भारत विरुद्ध वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेत अहमदाबाद इथं झालेला पहिला सामना भारतानं एक डाव आणि 140 धावांनी जिंकून मालिकेत 1–0 अशी आघाडी घेतली आहे. भारतीय गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत वेस्ट इंडिजला दुसऱ्या डावात चीत केलं. रविंद्र जडेजानं

चार, कुलदीप यादवनं दोन, तर वॉशिंग्टन सुंदर आणि मोहम्मद सिराजनं प्रत्येकी एक गडी बाद केला. वेस्ट इंडिजच्या अलिका अथानाझे याच्या 38 धावा वगळता इतर कोणताही खेळाडू आपला प्रभाव दाखवू शकला नाही.

हवामान-पूल
कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल तर विदर्भात काही ठिकाणी वीजांसह पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **युवावर्गाचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन. विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण**
- **अनुकंपा तत्वावरील आणि लिपिक श्रेणीतील 10 हजार 309 उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित.**
- **केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून लहान मुलांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वं प्रकाशित**
- **ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम अनंतात विलीन**

**आणि**

- **वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना जिंकून भारताची मालिकेत आघाडी**

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.